देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाचे मुखपत्र

# देशस्थ ऋग्वेदी पत्रिका




दुरध्वनी : ०२५३-२५९६४३६, भ्रमणभाष : ९३७३०९६६८९
Website: www.drbs nashik.in
Email : drbs2011@gmail.com

Bharat Sarkar R. N. 35920 /25-10-2025
दर महिन्याच्या ५ तारखेस अंक पोस्टात
(GPO, Nashik) टाकला जातो. मूल्य : ₹ १.००
इंटरनेट आवृत्ती

प्रिंटीग दि. ०१/०७/२०२६
✻ वर्ष ४९ ✻ अंक ६ ✻ जुलै २०२६
✻ वार्षिक वर्गणी रु. २०० ✻ नाशिक ✻

अध्यक्ष : मुकुंद कुलकर्णी ✻ कार्याध्यक्ष / संपादक : सुहास पाटील ✻ कार्यवाह : मकरंद सुखात्मे ✻ खजिनदार : विनायक एडगावकर ✻ कार्यकारी संपादक : मंदार तगारे

## देशस्थ ऋग्वेदी संस्थेच्या सामुदायिक व्रतबंधनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न !






संस्थेच्या वतीने मंगळवार दिनांक १६ जून २०२६ रोजी सामुदायिक व्रतबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या तिडके कॉलनीतील ऋग्वेद कार्यालयात झालेल्या या दिमाखदार सोहोळ्यात यावेळी ४ बटूंच्या मुंजी लावण्यात आल्या. सकाळी ७.३० वा. कार्यक्रमाची सुरुवात झाली. साडे अकरा वाजता सनईच्या मंजुळ स्वरात, ब्रह्मवृंदांच्या तालासुरातील मंगलाष्टकांच्या उद्घोषात व उपस्थितांच्या टाळ्यांच्या गजरात मुंजीचा कार्यक्रम अत्यंत नियोजनबद्ध रीतीने संपन्न झाला.

यावेळी संस्थेचे सभासद श्री. गरुड यांच्या तर्फे बटूंना तांब्याचे ताम्हण, लोटी भांडे, पळी तसेच दर्भासन भेट म्हणून देण्यात आले. संस्थेच्या वतीने सढळ हाताने देणगी दिलेल्या देणगीदार व संस्थेचे सभासद श्री. सुभाष प्रभाकर कुलकर्णी, श्री. प्रदीप मुरलीधर कुलकर्णी, श्री. गरुड व श्रीमती सुचेता सुधाकर देवरे यांचा संस्थेचे अध्यक्ष श्री. मुकुंदराव कुलकर्णी यांचे हस्ते उपरणे, गुलाब पुष्प







व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

संस्थेचे व्यवस्थापक श्री. दीपक जहागीरदार व कर्मचारी श्री. दत्तात्रय देवळालकर यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली केलेल्या चोख तयारी बाबत बटूंच्या पालक व पाहुण्यांनी संस्थेची प्रशंसा केली.


व्रताबंधाचे पौरोहित्य श्री. मनीष पैठणकर गुरुजी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. प्रत्येक विधीचा अर्थ व त्याची आवश्यकता या बाबत त्यांनी उपस्थितांचे प्रबोधन केले. चौलकर्माचे कार्य श्री. वाघ यांनी केले. तर केटरिंग व्यवस्था आपलीच सेवाचे श्री. मंदार, सौ. माधवी तगारे व त्यांच्या टीमने उत्कृष्ट रीतीने केली.





यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री मुकुंदराव कुलकर्णी, उपाध्यक्ष श्री. विजयकुमार क्षीरसागर, विश्वस्त श्री. मोहिनीराज कुलकर्णी, श्री. वसंत यशवंत कुलकर्णी, कार्याध्यक्ष श्री. सुहास पाटील, कार्यवाह श्री. मकरंद सुखात्मे, खजिनदार श्री. विनायक एडगांवकर, सहकार्यवाह श्री. राजेंद्र खेडलेकर, कार्यकारी मंडळ सदस्य श्री. राजेंद्र हातवळणे, श्री. निषाद दशपुत्रे, श्री. किशोर हिंगणे, श्री. प्रशांत निरंतर, श्री. अशोक कुलकर्णी, युवक शाखा कार्यवाह श्री. संदीप गोसावी, महिला शाखा कार्याध्यक्षा श्री. सविता कुलकर्णी (सातपूरकर), कार्यवाह सौ. सुजाता करजगीकर, सौ. सविता कुलकर्णी, श्रीमती सुचेता देवरे, सौ. मनीषा पाटील, सौ. माधवी तगारे, श्रीमती अमिता कुलकर्णी, सौ. विजया म्हैसपुरकर, संस्थेचे व्यवस्थापक श्री. दीपक जहागीरदार व कर्मचारी श्री. दत्तात्रय देवळालकर आदी उपस्थित होते.

## निज ज्येष्ठ पौर्णिमा आरती संपन्न



सोमवार, दिनांक २९ जून २०२६ रोजी श्री दुर्गा देवीची निज ज्येष्ठ पौर्णिमा आरती संस्थेचे माजी कार्यकारिणी सदस्य तथा सभासद श्री. अवधूत व सौ. राखी देशपांडे यांचे हस्ते संपन्न झाली. याप्रसंगी अवधूत यांचा संस्थेचे उपाध्यक्ष श्री. विजयकुमार हणमंत क्षीरसागर यांच्या हस्ते श्रीफळ व उपरणे देऊन सत्कार करण्यात आला, तर सौ. शुभांगी क्षीरसागर यांच्या हस्ते सौ. राखी यांची ओटी भरण्यात आली.

पौरोहित्य श्री. सारंग अलोनी गुरुजी यांनी केले. यावेळी संस्थेचे विश्वस्त श्री. वसंत यशवंत कुलकर्णी व श्री. मोहिनीराज कुलकर्णी कार्यवाह श्री. मकरंद सुखात्मे, सहकार्यवाह श्री. राजेंद्र खेडलेकर, कार्यकारिणी सदस्य श्री. राजेंद्र हातवळणे, युवक शाखा कार्यवाह श्री. संदीप गोसावी, माधुरी कुलकर्णी, कु. जान्हवी क्षीरसागर, संस्थेचे व्यवस्थापक श्री. दीपक जहागीरदार, कर्मचारी श्री. दत्तात्रय देवळालकर, सभासद व भाविक उपस्थित होते.

## अभिनंदन!



'आईना' आंतरराष्ट्रीय मंच आयोजित 'आईना हेरिटेज गोल्डन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये संस्थेचे सभासद स्वप्नील अविनाश कुलकर्णी यांचे 'आत्मा, ईश्वर और अस्तित्व के रंग' या ७७५ डिजिटल हिंदी काव्यसंग्रहात काव्य प्रसिद्ध झाले आहे. लवकरच त्याचे डिजिटल पुस्तक प्रकाशित होणार आहे. त्यांना 'आईना'च्या संस्थापक व प्रोजेक्ट संचालिका डॉ. ममता सैनी यांनी डिजिटल एरा लिंकद्वारे हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये प्रमाणपत्र प्रदान केले. संस्थेतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!

## मुलांची नावे

## वयोगट २३ ते २८

**गौरव गोपाल राजगुरू**

२३, ५'२'', वत्स, ऋग्वेदी, कानडी, सावळा, मनुष्य, मकर, उत्तराषाढा, अंत्य, दुसरे, A+ve, शिक्षण : १० वी पास. इलेक्ट्रेशियन कोर्स, नोकरी : सोहम टूर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स (ड्रायव्हर), मा. प्रा. : २०,०००/-, अपेक्षा : अनुरूप, १०-१२वी पास, पत्ता : श्री. नगर गोपाल राजगुरू, वरद विनायक हाईटस्, सप्तश्रृंगी नगर, जेलरोड, नाशिकरोड, नाशिक-४२२००१. मो. : ८३७९९०४९९२

**प्रसाद सुरेश कुलकर्णी**

२५, ५'९'', गार्ग्य, ऋग्वेदी, सावळा, राक्षस, धनू, मूळ, आद्य, O+ve, शिक्षण : M.Sc. (Drug Chemistry), नोकरी : फार्मास्युटीकल, मा. प्रा. : २५,०००/-, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : श्री. सुरेश मुरलीधर कुलकर्णी, मु. पो. पायरे खुर्द, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर, मो. : ९७६७२२७४४३

**योगेंद्र विनायक कुलकर्णी**

२५, ५'६'', मुनिभार्गव, ऋग्वेदी, सावळा, मनुष्य, कुंभ, पूर्वाभाद्रपदा, आद्य, तिसरे, A+ve, शिक्षण : B.E. (Civil), नोकरी : J.P. Structural MNC/ Sr. Structural Engineer, Nashik, मा. प्रा. : ४२,०००/-, अपेक्षा : नोकरी करणारी, अनुरूप, पत्ता : श्री. विनायक हरी कुलकर्णी, २, वेद रेसिडेन्सी, श्रद्धा विहार कॉलनी, वडाळा-पाथर्डी रोड, नाशिक-४२२००९. मो. : ९९७०४००८७०, ९३७०१९८४०४

**अभिजित गोपाल कुलकर्णी**

२५, ५'९'', गार्ग्य, ऋग्वेदी, गोरा, मनुष्य, मिथुन, आर्द्रा, आद्य, तिसरे, O+ve, शिक्षण : MBA (Finance), नोकरी : E-Cleark, pune, मा. प्रा. : २५,०००/-, अपेक्षा : अनुरूप, पत्ता ; श्री. गोपाळ मुरलीधर कुलकर्णी, फ्लॅट नं. १, श्रीनंद अपार्टमेंट, ४ था चौक, गोविंदनगर, नाशिक. मो. : ९८२२८४६२३१, ९१६८०३१२२२

**तन्मय श्रीकांत गर्गे**

२५, ५'११'', गर्ग, देशस्थ, गोरा, राक्षस, तुळ, विशाखा, अंत्य, पहिले, चष्मा आहे, B-ve, शिक्षण : M.Sc. (Computer), नोकरी : Developes Engineer, Mumbai, मा. प्रा. : ५०,०००/-, अपेक्षा : नोकरी करणारी, मनमिळाऊ, पत्ता : श्री. श्रीकांत रामचंद्र गर्गे, फ्लॅट नं. १३, अर्चित रिजन्सी, सावरकर नगर, गंगापूररोड, नाशिक. मो. : ९८५०६४०९०४

**वैभव बाळकृष्ण कुलकर्णी**

२५, ५'५'', कौशिक, ऋग्वेदी, राक्षस, तुळ, चित्रा, मध्य, तिसरे, A+ve, शिक्षण : B.E. नोकरी : Software Professional at Selfmade Software Private, मा. प्रा. : ६३,६६६/-, अपेक्षा : अनुरूप, बी. ई. किंवा सायन्स संबंधित पदवीधर, मनमिळाऊ, पत्ता : श्री. वैभव बाळकृष्ण कुलकर्णी, १०, दत्तनगर, ओंकार कॉलनीजवळ, चैतना क्लासिक, नागापूर एमआयडीसी, अहिल्यानगर-४१४१११. मो. : ९९२१२२३१७५

**निशांत विकास कापसे**

२५, ५'५'', काश्यप, देशस्थ ऋग्वेदी, मनुष्य, मीन, पूर्वाभाद्रपदा, आद्य, चवथे, चष्मा आहे, शिक्षण : B.A., नोकरी : बजाज फायनान्स, मा. प्रा. : २५,०००/-, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : श्री. विकास प्रकाश कापसे, ६, नाईशा रेसिडेन्सी, समर्थ नगर, तपोवन लिंकरोड, काठे गल्ली, नाशिक-४२२०११, मो. : ९४२२७३१२५६, ९९६०६०२४९६

**हार्दिक गिरीष भार्गवे**

२७, ५'९'', भार्गव, देशस्थ ऋग्वेदी, गोरा, देव, कर्क, पुष्य, मध्य, पहिले, AB+ve, शिक्षण : M.Pharm, M.B.A., नोकरी : मुंबई, मा. प्रा. : ९०,०००/-, अपेक्षा : सुशिक्षित, एकत्र कुटुंबात राहणारी, गोरी, पत्ता ; गिरीष प्रभाकर भार्गवे, कसबे सुकेणे, ता. निफाड, जि. नाशिक-४२२२०१. मो. : ७५८८०१४५२८, ९९२१२४२४९६

**ईशान सारंग इंगळे**

२५, ६'१'', गार्ग्य, देशस्थ ऋग्वेदी, गौरे, चष्मा आहे, राक्षस, वृषभ, कृत्तिका, अंत्य, तृतीय, A+ve, शिक्षण : M.Sc. (Physics), नोकरी : सोल्यूशन सोशालिस्ट इन इंडस्ट्रियल एनर्जी, मा. प्रा. : ५०० ओमानी रियाल, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : डॉ. सारंग अशोक इंगळे, प्राची बंगला, विजयनगर, जगताप मळा, के. जे. मेहता रोड, गजानन महाराज मंदिराजवळ, नाशिकरोड, नाशिक-४२२१०२, मो. : ९२२६७७९८४२, ९२७२४९१३१६

**प्रणव सुहासचंद्र पटवारी**

२५, ५'४'' काश्यप, कण्व, गोरा, राक्षस, कुंभ, शततारका, आद्य, तृतीय, चष्मा आहे, AB+ve, शिक्षण : B.E. (Mech.), नोकरी : Thyssen krupp Rothe Erde German MNC R&D CAE मा. प्रा. : ६६,०००/-, अपेक्षा : व्यावसायिक शिक्षण, नाशिक, धुळे, जळगाव परिसरातील, अनुरूप, पत्ता : श्री. सुहासचंद्र नारायण पटवारी, फ्लॅट नं. ७, वैष्णवी अपार्टमेंट, सप्तश्रृंगी फ्लोअर मिल समोर, विनयनगर, नाशिक-४२२००६. मो. : ७३८५५९६९३६, ९८२२०३२३६२

**अमित आनंद चावरेकर**

२५, ५'५', वशिष्ठ, ऋग्वेदी, राक्षस, कर्क, आश्लेकशश, अंत्य, तिसरे, चष्मा आहे, AB+ve, शिक्षण : MCA, नोकरी : CitiUS Tech., मा. प्रा. : ६५००० /- +, अपेक्षा : सुशिक्षित, संस्कारी, कुटुंबवत्सल, पत्ता : श्री. आनंद जयवंत चावरेकर, फ्लॅट नं. ५, ए-विं, ३ रा मजला, राही टेरेस, शाहू बँकेवर, महाराष्ट्र बँकेशेजारी, नऱ्हे, पुणे-४११०४१. मो. : ९९७५२२२४३१, ७०८३८३७८९६

**उदय मुकुंद देशमुख**

२६, ५'६'' उद्दालक, यजुर्वेद, गव्हाळ, मनुष्य, वृषभ, रोहिणी, अंत्य, चतुर्थ, AB+ve, शिक्षण : Diploma, MBA Appear, नोकरी : Nexa, Maruti Automobile, E-Vehicle Manager, मा. प्रा. : ३०,०००/-, अपेक्षा : ग्रॅज्युएट, मनमिळाऊ, समंजस, पत्ता : श्री. मुकुंद सुधाकर देशमुख, सप्तश्रृंगी रो-हाऊस नं. ५, महाराणा प्रताप चौकामागे, लक्ष्मीनगर, महाले फार्म, नाशिक. मो. : ९३२५६६९०८५, ९८२३९१४३६२

**भाग्येश श्रीकांत देशपांडे**

२६, ५'९'', कश्यप, गोरा, सौम्य मंगळ, चष्मा आहे, मनुष्य, धनु, पूर्वाषाढा, मध्य, प्रथम, A+ve, शिक्षण : डिप्लोमा व डिग्री यांत्रिक अभियांत्रिकी, नोकरी : मुंबई येथे एमएनसीमध्ये, मा. प्रा. : प्रत्यक्ष भेटीत सांगू, अपेक्षा : नोकरी असावी, ग्रॅज्युएट, गोरी, गृहकर्तव्यदक्ष, पत्ता : श्री. श्रीकांत रा. देशपांडे, १०, लिबर्टी अपार्टमेंट, विशाल नगर, अंबाडी रोड, वसई (प.)-४०१२०२, मो. : ७७२०००७४२३

**अथर्व मंगेश कुलकर्णी**

२६, ५'३'', कौशिक, ऋग्वेदी, गोरा, सौम्य मंगळ, राक्षस, मेष, कृत्तिका, अंत्य, प्रथम, B+ve, शिक्षण : HSC/MS-CIT, नोकरी : खाजगी, मा.प्रा. : १८,०००/-, अपेक्षा : सुस्वभावी, मनमिळाऊ, पत्ता : श्री. मंगेश रमाकांत कुलकर्णी, फ्लॅट नं. १, साई गणेश प्रसाद अपार्टमेंट, कपालेश्वर नगर, संभाजीनगर रोड, तपोवन, नाशिक. मो. : ९३५९९७८४७२, ७४९९३९२६४५

**रोहित जयंत निरंतर**

२६, ५'३'', भारद्वाज, ऋग्वेदी, गोरा, मनुष्य, कन्या, उत्तरा फाल्गुनी, आद्य, दुसरे, O+ve, शिक्षण : बी. ए. (संस्कृत), वेदशास्त्र संपन्न, व्यवसाय : पौरोहित्य, मा. प्रा. : ५०,०००/-. अपेक्षा : सुसंस्कृत, पदवीधर, पत्ता : सौ. किर्ती सचिन निरंतर, ७, त्रिशला अपार्टमेंट, श्रीरामनगर, दिंडोरी रोड, महालक्ष्मी टॉकिज मागे, पंचवटी, नाशिक-४२२००३. मो. : ९९२२१७३२८७, ९८५०७१९९११

**अमेय मोहन गोसावी**

२६, ५'६'', भारद्वाज, ऋग्वेदी, राक्षस, तुळ, विशाखा, अंत्य, प्रथम, O+ve, शिक्षण : M.Sc., (Computer), नोकरी : Software Engineer at Benchmark IT Solutions, Pune, मा. प्रा. : १ लाख, अपेक्षा : शाकाहारी, वयात अंतर २-३ वर्षे, नोकरी करणारी, कुटुंबवत्सल, प्रेमळ, पत्ता : श्री. मोहन गजानन गोसावी, फ्लॅट नं. ई-२०३, सुखवानी स्कायलारन्स, शुभंकरदास गुर्गे रोड, भगवान नगर, भुमकर नगर, वाकड, पिंपरी चिंचवड-४११०५७, मो. : ७९७२५७१०७९

**राजेश प्रविण रणभोर**

२६, १७० सेमी, काश्यप, यजुर्वेदी, गव्हाळ, मनुष्य, मेष, भरणी, मध्य, दुसरे, चष्मा आहे, O+ve, शिक्षण : B.E. (Civil), नोकरी : नवी मुंबई, मा. प्रा. : ५०,०००/-, अपेक्षा : अनुरूप, सुस्वभावी, पत्ता : श्री. प्रविण भगवान रणभोर, फ्लॅट नं. १२, कुणाल पार्क, सिक्स सिग्मा हॉस्पिटल जवळ, महात्मानगर, नाशिक -४२२००७, मो. : ९१६८१०६८६८

**पुरुषोत्तम हेमंत बोबडे**

२६, ५'३'' गौतम, यजुर्वेदी, निमगोरा, राक्षस, धनु, मूळ, आद्य, पहिले, O+ve, शिक्षण : MBA (Finance), B.Com. (Finance), नोकरी : बँकिंग व फायनान्स, मा. प्रा. : ४.३० लाख, अपेक्षा : अनुरूप, मनमिळाऊ, पत्ता : श्री. हेमंत प्रल्हाद बोबडे, जनतानगर, गल्ली नं. ५, पश्चिम भाग, संगमनेर, जि. अहमदनगर-४२२६०५, मो. : ८९९९३८४९४

**आशिष सुनील सांबरे (कुलकर्णी)**

२६, ५'८'', भारद्वाज, ऋग्वेदी, गोरा, मनुष्य, मिथुन, आर्द्रा, आद्य, पहिले, A+ve, शिक्षण : M.Tech., (App.), B.E. (Electrical), नोकरी : ऋषभ इन्स्ट्रुमेंट लि., नाशिक. वा. प्रा. : ६ लाख, अपेक्षा : अनुरूप, पदवीधर, मनमिळाऊ, नोकरी असल्यास चालेल. पत्ता : श्री. सुनील अनंतराव सांबरे (कुलकर्णी), मु. पो. लोणी, बु.।।, ता. रहाता, जि. अहिल्यानगर-४१३७३६. मो. : ९८२२८६९४९०, ८६९८३९३६८९

**अथर्व दीपक देशमुख**

२६, ५'३'', जमदग्नी, ऋग्वेदी, गोरा, राक्षस, तुळ, विशाखा, अंत्य, तिसरे, A+ve, शिक्षण : MCA, नोकरी : Cybersecutiry Researcher at Qyasar, मा. प्रा. : ६१,०००/-, अपेक्षा : उच्चशिक्षित, अनुरूप, निर्व्यसनी, पत्ता : श्री. दीपक विनायक देशमुख, बी-५/३०४, गंगा कॉन्स्टेला, इऑन आय.टी.पार्कजवळ, खराडी, पुणे-४११०१४, मो. : ९५२७७८८३६८

**सुयश जयंत मुळे**

२६, ५'११'', यजुर्वेदी, देव, वृश्चिक, गोरा, अनुराधा, मध्य, तिसरे, B+ve, शिक्षण : B.Sc., B.Ed., नोकरी : अमालगमेटेड कंपनी, नाशिक. मा. प्रा. : २५,०००/-, अपेक्षा : बारावी/पदवी, नोकरी नसली/असली तरी चालेल, अनुरूप, पत्ता : श्री. जयंत अरविंद मुळे, सुयश क्लासेस, १९७४, तिवंधा लेन, बुधा हलवाईजवळ, जुने नाशिक. मो. : ९८२३१७१३४२

**मयुरेश दीपक कुलकर्णी**

२६, ५'८'', भारद्वाज, ऋग्वेदी, ब्राह्मण, मनुष्य, मीन, उत्तरभाद्रपदा, मध्य, चतुर्थ, B+ve, शिक्षण : B.M.S. in HR, MBA in HR, नोकरी : योलोहेल्थ इंडिया प्रा.लि., मा. प्रा. : २४,०००/-, अपेक्षा : नोकरी करणारी, पत्ता : श्री. दीपक सुधाकर कुलकर्णी, 'श्रीस्मरण', २०२, सेक्टर-९, खांदा कॉलनी, पनवेल, मो. : ९३२४७९५०८०

**शुभम माधव हर्डीकर**

२६, ५'३'', गौतम, कऱ्हाडे, निमगोरा, देव, मेष, आश्विनी, आद्य, चतुर्थ, O+ve, शिक्षण : B.E. (Mech.), नोकरी : महिन्द्रा अॅन्ड महिन्द्रा, मा. प्रा. : ७०,०००/-, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : श्री. माधव अनंत हर्डीकर, ४, रेन्सी पार्क, गणेशनगर, काठेगल्ली, द्वारका, नाशिक-४२२०११. मो. : ९९२२४२८९४९, ८३७८९८५७१७

**कौस्तुभ राजेंद्र ढेरगे**

२६, ५'५'', गौतम, यजुर्वेदी, सावळा, चष्मा, मनुष्य, मिथुन, आर्द्रा, आद्य, चवथे, B+ve, शिक्षण : B.Com., CA, नोकरी : सीए ऑफिस, मा.प्रा. : ३५-४०, ०००/-, अपेक्षा : सुशिक्षित, समजुतदार, गृहकृत्यदक्ष, पत्ता : श्री. राजेंद्र त्र्यंबक ढेरगे, स्वामी विवेकानंद नगर, गोविंदा रो-बंगलो, मखमलाबाद, नाशिक-४२२००३, मो. : ९२८४१३५४१८

**नचिकेत मोहन कोरान्ने**

२६, ५'२'', हरितस, ऋग्वेदी, गव्हाळ, मनुष्य, धनु, उत्तराषाढा, अंत्य, पहिले, O+ve, शिक्षण : M.A., नोकरी : ई-कॉमर्स, प्रोप्रायटर सन स्टाइल एन्टरप्राइजेस, मा. प्रा. : १ लाख, अपेक्षा : अनुरूप, पदवीधर, शाकाहारी, मनमिळाऊ, पत्ता : श्री. मोहन निळकंठ कोरान्ने, ६, वसंत अपार्टमेंट, शंकरनगर, गंगापूररोड, नाशिक-४२२०१३. मो. : ९८८७०३३२९७

**चिन्मय दीपक घोडके**

२६, ५'६'', शांडिल्य, यजुर्वेदी, राक्षस, कुंभ, शततारका, आद्य, दुसरे, O+ve, शिक्षण : B.E. (IT), नोकरी : Software Eng. in Tata Consultancy Services, मा. प्रा. : ६०,०००/-, अपेक्षा : कौटुंबिक, निर्व्यसनी, एकमेकांना समजून घेणारी, सुशिक्षित, पत्ता : श्री. दीपक श्रीकांत घोडके, फ्लॅट नं. १६, तिसरा मजला, ज्योतीकलश अपार्टमेंट, सुमन हॉस्पिटलजवळ, जयभवानी रोड, नाशिकरोड, नाशिक-४२२१०१. मो. : ९४२१५७४८३४, ८७९३८६९०२१

**तेजस सुनील कोदरीकर**

२६, ५'९'', काश्यप, देशस्थ, गव्हाळ, राक्षस, तुळ, विशाखा, अंत्य, दुसरे, A+ve, शिक्षण : MBA Finance (Mumbai), नोकरी : यस बँक लि., मा. प्रा. : ४५,०००/-, अपेक्षा : एमबीए किंवा ग्रॅज्युएट, नोकरी करण्याची इच्छा, पत्ता : श्री. सुनील प्रल्हाद कोदरीकर, बी-३२, दुर्गानगर, गजानन कृपा, के. के. वाघ इंजिनिअरींग कॉलेज मागे, अमृतधाम, पंचवटी, नाशिक-४२२००३. मो. : ८२७५११३०४३ / ९७६३२२५९९३

**अमेय संजय बुलाख**

२७, ६'२'', गार्ग्य, देशस्थ यजुर्वेदी, गोरा, चष्मा आहे, मनुष्य, मीन, उत्तरा भाद्रपदा, मध्य, दुसरे, AB+ve, शिक्षण : B.E. Mechanical, नोकरी : Tower Automotive, Hyderabad, वा. प्रा. : ९.६० लाख, अपेक्षा : अनुरूप, नोकरी करणारी, एकत्र कुटुंबात राहणारी, पत्ता : श्री. संजय कृष्णाजी बुलाख, फ्लॅट नं. ८, शीतल सोसायटी, हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे-४११०५१, मो. : ९४२३२०६२७३

**पार्थ उल्हास कुलकर्णी**

२७, ५'३'', वशिष्ठ, ऋग्वेदी, वैश्य (सावळा), देव, मकर, श्रवण, अंत्य, द्वितीय, O+ve, शिक्षण : प्रॉडक्शन इंजिनिअर, नोकरी : Senior Associate Consultant, इन्फोसिस, पुणे, मा. प्रा. : ८३५००/-, अपेक्षा : घरात सर्वांना सांभाळून घेणारी, कोण्यात्याही शाखेची पदवीधर, स्वयंपाक साधारण यावयाच हवा, पत्ता : श्री. उल्हास बळवंत कुलकर्णी, फ्लॅट नं. २, अजिंक्य अपार्टमेंट, अश्वमेध कॉलनी, राजीवनगर, नाशिक-४२२००९. मो. : ८२०८६१७१०२

**अथर्व सखाराम हिस्वनकर**

२७, ५'११'', भारद्वाज, यजुर्वेदी, धनु, पूर्वाषाढा, गोरा, मनुष्य, मध्य, चवथे, O+ve, शिक्षण : M.Tech. Automotive Electronics (2024-26), BITS Pilani, B.Tech. (Mech.), नोकरी : Sr., Engineer, Powertrain Software Development Chengalpattu Tamilnadu, मा. प्रा. : ५८,०००/-, अपेक्षा : कोणत्याही शाखेची, B.E. Technical Background, नोकरी करणारी, व्यसन नको, धार्मिक, Well Cooking, Ready to Stay all over India, पत्ता : श्री. सखाराम हिस्वनगर, रो-हाऊस नं. ३, प्रेमजित रेसिडेन्सी, गट नं. २१/२२, स्वामी समर्थ केंद्राजवळ, कमल नयन बजाज हॉस्पिटल मागे, सातारा, छ. संभाजीनगर-४३१०१०. मो. : ९४२३३९५३९५

**सिद्धार्थ मंगेश सोनक**

२७, ५'९'', लोहित, ऋग्वेदी, गोरा, वैश्य, सौम्य मंगळ, देव, कन्या, हस्त, आद्य, प्रथम, A+ve, शिक्षण : B.E. (Elect) व मास्टर्स इन इंजिनिअरींग मॅनेजमेंट, युएसए, नोकरी : GCNA, America, मा. प्रा. : ८ लाख, अपेक्षा : सुशिक्षित, संस्कारी, निर्व्यसनी, गोरी,

अमेरिकेत किमान ७-८ वर्षे राहण्याची तयारी, पत्ता : श्री. मंगेश भास्कर सोनक, फ्लॅट नं. ४, विनायक अपार्टमेंट, रोड-ए, महात्मानगर, नाशिक-४२२००७. मो. : ९६७३३३०७९४, ९८२३५०८९००

**संकेत मिलींद देशपांडे**

२७, ५'८'', काश्यप, देशस्थ ऋग्वेदी, गोरा, मंगळ, मनुष्य, कुंभ, पूर्वा भाद्रपदा, आद्य, तिसरे, A+ve, शिक्षण : B.E. (Computer), नोकरी : इंजिनिअर, जनरल मील्स, पवई, मा. प्रा. : ८८,०००/-, अपेक्षा : मुलगी सालस, मध्यमवर्गीय व नोकरी करणारी असावी, पत्ता : श्रीमती प्रिती मिलींद देशपांडे, फ्लॅट क्र. ८, मिनाक्षी अपार्टमेंट, भीकमचंद जैन नगर, जळगाव. मो. : ७५८८३५५०५२, ९९६०३२८९५९

**चैतन्य श्रीधर कुलकर्णी**

२७, ५'७'', वसिष्ठ, ऋग्वेदी, गोरा, देव, कर्क, पुनर्वसू, आद्य, चवथे, B+ve, शिक्षण : B.E. (Mech.), नोकरी : सिमेन्स एनर्जी इंडिया लि., मा. प्रा. : ५५,०००/-, अपेक्षा : कोणत्याही ब्राह्मण शाखेची, पोस्ट ग्रॅज्युएट, इंजिनिअर, एमबीए, पत्ता : श्री. श्रीधर पद्माकर कुलकर्णी, एन-३२/एफ-१, १२-८, सप्तश्रृंगी चौक, जुनेसिडको, नाशिक-४२२००९. मो. : ९४२३५५६०९१, ९५५२३११६३५

**आशिष विपिन रत्नपारखी**

२७, १६७ सेमी, अगस्ती. देशस्थ ऋग्वेदी, निमगोरा, राक्षस, कर्क, आश्लेषा, अंत्य, दुसरे, A+ve, शिक्षण : B.Com., C.A., नोकरी : Manager, Deloitte (Mumbai) मा. प्रा. : १.५० लाख, अपेक्षा : CA, ICWA, CS, Doctor, MBA, Job, फायनान्समधील व्यावसायिक पदवी / बँक/ एलआयसी, पत्ता : श्री. विपिन दिनकर रत्नपारखी, १८०४, लोढा आमरा, कोळशेत रोड, ठाणे (प.)-४००६०७, मो. : ९९२०३०८७६४, ९७६६१२२१०४

**सिद्धेश देवीचंद मानधने**

२७, ५'८'', पोलांश, माहेश्वरी (मारवाडी ब्राह्मण), गोरा, आद्य, राक्षस, कुंभ, शततारका, तिसरे, O+ve, शिक्षण : I.T. Engineer, नोकरी : Work from home WHO ( IT Com US) , वा. प्रा. : १० लाख, अपेक्षा : उच्चशिक्षित, सोज्वळ, कुटुंबवत्सल, पत्ता : मनिषा देवीचंद मानधने, आराध्या रेसिडेन्सी, आनंदनगर, मुक्तीधामच्यामागे, नाशिकरोड, नाशिक-४२२१०१, मो. : ९६०४६९६२५७

**अनुदीप दिलीप कुलकर्णी**

२८, ५'११'', जमदग्नी, ऋग्वेदी, राक्षस, वृषभ, कृत्तिका, अंत्य, तृतीय, A+ve, शिक्षण : M.Sc., Computer Science, नोकरी : Lead Operations & LMS Admin, Pune, वा. प्रा. : ८ लाख, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : श्री. दिलीप नारायण कुलकर्णी, सोनं पॅलेस, तुकाराम नगर, खराडी रोड, पुणे-१४. मो. : ९८२२५४२८२२, ९६५७२२१९१८

**निनाद संतोष पाठक**

२८, ५'९'', कृष्णात्रे, यजुर्वेदी, गोरा, राक्षस, कर्क, आश्लेषा, अंत्य, तिसरे, A+ve, शिक्षण : B.E. (Mech.), नोकरी : कार्यकारी अभियंता, एनटीपी लि. जि. खरगाव (मध्यप्रदेश), मा. प्रा. : १ लाख, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : श्री. संतोष प्रल्हाद पाठक, फ्लॅट नं. २१, ए-विंग, निर्माण उपवन, ढिकले नगर, काळाराम मंदिरासमोर, पंचवटी, नाशिक-४२२००३. मो. : ७७४५८५३४२२, ८७९३५२३८२७

**निलचंद्र घन:शाम कुलकर्णी**

२८, ५'५'', लोकाक्ष, देशस्थ, गोरा, देव, वृश्चिक, अनुराधा, मध्य, द्वितीय, A+ve, शिक्षण : कॉम्प्युटर इंजिनिअर (जावा), नोकरी : एचडीएफसी बँक, मा. प्रा. : ३५,०००/-, अपेक्षा : अनुरूप, नोकरी करणारीस प्राधान्य, पत्ता : श्री. घन:शाम वसंतराव कुलकर्णी, 'घनुनील' मित्तल रो-हाऊस, नं. ३, चेतना नगर, राणेनगर, नाशिक. मो. : ७४९९८२५२१७, ७६२०५२११५१

**सत्यम संजय पाटील**

२८, ५', कौशिक, यजुर्वेदी, गोरा, राक्षस, कन्या, चित्रा, मध्य, प्रथम, शिक्षण : B.A. (History) MSW, नोकरी : टि.डी. के. प्रा. लि., सातपूर, वा. प्रा. : ९.५ लाख, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : श्री. संजय भास्कर पाटील, पिंपरी (बु.।।) पो. पिंपळगाव हरेश्वर, ता. पाचोरा, जि. जळगाव-४२४२०३. मो. : ७४९९०८४१४९

**मंदार सुधीर देशपांडे**

२८, ५'८'', गौतम, देशस्थ ऋग्वेदी, गव्हाळ, राक्षस, कुंभ, धनिष्ठा, मध्य, चवथे, O+ve, शिक्षण : B.E. (Mech.), नोकरी : Quality Executive, MNC कंपनी, अंबड, नाशिक. अपेक्षा : गृहकृत्यदक्ष, अनुरूप, नोकरीस प्राधान्य, पत्ता : श्री. सुधीर मोरेश्वर देशपांडे, १२/श्रीबालाजी अॅव्हेन्यू, आशापुरी मॉलजवळ, जगतापनगर, उंटवाडी रोड, नाशिक. मो. : ९०४९८१०९१९, ९८१०६३३७०९

**ओमकार श्रीपाद कुलकर्णी**

२८, ५'५'', भारद्वाज, देशस्थ ऋग्वेदी, गहू, राक्षस, कर्क, आश्लेषा, अंत्य, तिसरे, O+ve, शिक्षण : B.E. (Electrical), नोकरी : डिझाईन विभाग, पॉप्युलर स्विचगिअर, गोंदे, नाशिक. मा. प्रा. : ३०,०००/-, अपेक्षा : अनुरूप, सुस्वभावी, सुशिक्षित, मनमिळाऊ, नोकरी असल्यास चालेल, पत्ता : श्री. श्रीपाद मनमोहन कुलकर्णी, ८, सावली हौसिंग सोसायटी, सुकदेव शाळेमागे, इंदिरानगर, नाशिक-९. मो. : ७७७००५३८२६

**सर्वेश संतोष तारे**

२८, ५'३'', अत्रि, ऋग्वेदी, राक्षस, मीन, रेवती, अंत्य, पहिले, AB+ve, शिक्षण : B.E. Mechanical, PG SAP, PG DERP, नोकरी : Deloitte (US) Mumbai, मा. प्रा. : १००,०००/-, अपेक्षा : नोकरी करणारी, उच्चशिक्षित, अनुरूप, पत्ता : श्री. संतोष श्रीराम तारे, बी-१००७, निलसिद्धी रेंगालिया, सेक्टर -२, प्लॉट नं. २२, खांदा कॉलनी, रायन शाळेसमोर, पनवेल-४१०२०६, मो. : ९८६९२८२२४२

**श्रीश संजय जोशी**

२८, ५'६'', गार्ग्य, यजुर्वेदी, मनुष्य, कन्या, उत्तराषाढा, आद्य, दुसरे, B+ve, शिक्षण : बी.ई. मेकॅनिकल, नोकरी : स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई, मा. प्रा. : ५५,०००/-, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : श्री. संजय वसंत जोशी, ४८, कल्पतरूनगर, अशोकामार्ग, हॉटेल सिद्धार्थमागे, पुना रोड, नाशिक-४२२०११. मो. : ९०११२२८३५२, ८४५९०१४६५६

**सिद्धार्थ सुहास कुलकर्णी**

२८, ६'२'', भारद्वाज, यजुर्वेदी, गोरा, राक्षस, तुळ, विशाखा, अंत्य, तिसरे, A+ve, शिक्षण : MBA (Sales & Marketing), नोकरी : HDFC Mutual Fund, Nashik, मा. प्रा. : २५,०००/-, अपेक्षा : नोकरी करणारी, मनमिळावू, सुस्वरूप, सुशिक्षित, पत्ता : श्री. सुहास श्रीपाद कुलकर्णी, ३, एलाइट अपार्टमेंट, तिडके कॉलनी, नाशिक-४२२००२. मो. : ९४२३१७९०६०

**अभिषेक विनोद शुक्ल**

२८, ५'६'', धारणस्य, यजुर्वेदी, गोरा, मनुष्य, मकर, उत्तराषाढा, अंत्य, चवथे, A+ve, शिक्षण : Diploma in E&TC, PCB Designing, Engineering in Mumbai, अंधेरी, मुंबई, मा. प्रा. : ४०,०००/-, अपेक्षा : अनुरूप, उच्चशिक्षित, सुस्वभावी, पत्ता : श्री. विनोद मनोहर शुक्ल, ए/१०२, अंबर स्टार को-ऑप. हौसिंग सोसायटी, खंबाळपाडा, आरबीटी विद्यालयाजवळ, डोंबिवली (पू.)-४२१२०६, मो. : ८०९७१८३२६९, ९०२९६८९६४३

**मोहित मिलींद कुलकर्णी**

२८, ५'७'', भारद्वाज, ऋग्वेदी, गोरा, राक्षस, वृश्चिक, अनुराधा, आद्य, प्रथम, A+ve, शिक्षण : M.Sc. (Chemistry), नोकरी : खाजगी कंपनी, अंबरनाथ, मा. प्रा. : ५०,०००/-, अपेक्षा : वयात अंतर ०-३ वर्षे, नोकरी असल्यास प्राधान्य, पोटशाखा चालेल, पत्ता : श्री. मिलींद पुरुषोत्तम कुलकर्णी, फ्लॅट नं. १९/अ, जमनादास पार्क, कोरीट रोड, नंदूरबार-४२५४१२, मो. : ८८०५८५२६५८

**इंद्रनील सतिश जोशी**

२८, ५'८'', वशिष्ट, देशस्थ ऋग्वेदी, गव्हाळ, देव, कर्क, पुनर्वसू, आद्य, गर, A-ve, शिक्षण : B.E., E&TC, M.Des. (Master in Design) from MIT, Pune, नोकरी : Everllence India Pvt. Ltd., छ. संभाजीनगर, वा. प्रा. : ६ लाख, अपेक्षा : अनुरूप, नोकरी करणारी, मनमिळाऊ, पत्ता : श्री. सतिश श्रीराम जोशी, गोकर्ण, ९६६/३ बी, इच्छामणी कॉलनी, खोडे मळा, जुने सिडको, नाशिक-४२२४०९. मो. : ९८८१०६७७२८

**विदीश प्रसाद काळे**

२८, ५'९'', वसिष्ठ, देशस्थ, गोरा, राक्षस, वृश्चिक, विशाखा, अंत्य, चतुर्थ, AB+ve, शिक्षण : B.E. (Computer Engineer), नोकरी : Subject Matter Expert, BOSCH, Pune, अपेक्षा : कुठल्याही शाखेतील ग्रॅज्युएट, शाकाहारी, पत्ता : श्री. प्रसाद रामचंद्र काळे, आनंदश्री हौसिंग सोसायटी, प्लॉट नंबर ४०, वाळवेकर नगर, पर्वती, पुणे-४११००९. मो. : ९४२३०७६१७९, ९४२२००२२१८

**पियुष अविदत्त बारसोडे**

२८, ६'१'', शांडिल्य, यजुर्वेदी, गोरा, मनुष्य, कन्या, उ. फाल्गुनी, चवथे, आद्य, B+ve, शिक्षण : B.Tech. (VJTI), व्यवसाय, मा. प्रा. : १ लाख, अपेक्षा : अनुरूप, सुशिक्षित, नोकरी करणारी, नाशिकस्थित, पत्ता : श्री. अविदत्त मधुकर बारसोडे, 'प्रथमेश'बंगला, प्लॉट नं. ८, शास्त्रीनगर हौसिंग सोसायटी, महिला बँकेशेजारी, इंदिरानगर, नाशिक-४२२००९. मो. : ९४२२२४९९४९, ८४६८९६९७८७५

**अखिलेश रवींद्र गरूड**

२८, ५'५'',, वार्धस्व, ऋग्वेदी, गोरा, देव, वृषभ, मृग, मध्य, तिसरे, O+ve, शिक्षण : B.E. (Mechanical), नोकरी : बेरीकॅप (इं.), पुणे, मा. प्रा. : ६०,०००/-, अपेक्षा : गोरी, ग्रॅज्युएट, इंजिनिअर/तत्सम, नोकरी करणारी, घरातल्या सर्वांना सांभाळणारी, पत्ता : श्री. रवींद्र जयंत गरूड, ११, नेपच्यून बिल्डिंग, विंडसर कॅसला, जयाबाई कॉलनी, घंटा म्हसोबा मंदीर, बिगबाजारमागे, नाशिकरोड, नाशिक-४२२१०१, मो. : ७८७५५५१८६५

**कुणाल मिलींद पुरंदरे**

२८, ५'६'', भारद्वाज, देशस्थ ऋग्वेदी, गव्हाळ, मनुष्य, मिथुन, आर्द्रा, आद्य, चवथे, AB+ve, शिक्षण : B.E. (E&TC), CDAC, नोकरी : अॅपेक्स कंपनी, बाणेर, पुणे, मा. प्रा. : १.८० लाख, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : श्री. मिलींद चंद्रकांत पुरंदरे, फ्लॅट नं. १०, अजिंक्य प्राईड सोसायटी, उत्तरानगर, तपोवन लिंक रोड, नाशिक. मो. : ९४२३९६५३८९

## वयोगट २९ ते ३४

**जय सुहास चौगावकर**

२९, ५'७'', कौशिक, ऋग्वेदी, गोरा, सौम्य, चष्मा आहे, राक्षस, कन्या, चित्रा, मध्य, दुसरे, B+ve, शिक्षण : MBA (Finance) BBA (E-Commerce), नोकरी : LTI Mindtree, Pune, मा. प्रा. : ५०,०००/-, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : सुषमा सुहास चौगांवकर, प्लॉट नं. ७९, शारदा नगर, दत्तमंदिर चौकामागे, देवपूर, धुळे-०२. मो.:९८८१४००३५६, ७७७६८६१०६०

**सुश्रुत मुकुंद कुलकर्णी**

२८, ५'८'', गौतम, ऋग्वेदी, गोरा, मनुष्य, सिंह, उत्तराषाढा, आद्य, प्रथम, O+ve, शिक्षण : M.Tech. (AD/CAM) VJTI, Mumbai, नोकरी : MNC, Pune, मा. प्रा. : १.५० लाख, अपेक्षा : मनमिळाऊ, अनुरूप, शिक्षित, कुटुंबाभिमुख, पारंपारीक मूल्य जपणारी, पत्ता : श्री. मुकुंद गोविंद कुलकर्णी, विजयनगर, दिंडोरी, नाशिक-४२२२०२. मो. : ९८९००२२१०९, ९९२२४२०४३६

**निरंजन मिलिंद जोशी**

२९, ६', भार्गव, यजुर्वेदी, देव, कन्या, उजळ, हस्त, आद्य, प्रथम, A+ve, शिक्षण : BCA, MBA (Digital Marketing), व्यवसाय : स्वत:चा व्यवसाय, मा. प्रा. : ६०,०००/-, अपेक्षा : अनुरूप, सुसंस्कारी, शक्यतो नोकरी करणारी, पत्ता : श्री. मिलिंद मधुकर जोशी, व्यंकटेश हौसिंग सोसायटी, १६, मातृछाया, शिवाजीनगर, विजय-ममता टॉकिजसमोर, नाशिक-४२२००६, मो. : ९९२१३४५४७५

**धीरज विलास कुलकर्णी**

२९, ५'१०'', अगस्ती, ऋग्वेदी, गोरा, मनुष्य, धनु, पूर्वाषाढा, मध्य, दुसरे, B-ve, शिक्षण : B.Sc., Agri, MBA, नोकरी : पुणे, मा. प्रा. : ४०,०००/-, अपेक्षा : समजुतदार, पुणे येथे जॉब, पत्ता : श्री. विलास बापूराव कुलकर्णी, आनंदनगर, विंचुररोड, येवला-४२३४०१, मो. : ९४२१५०९९०, ९४०४५७१९२९

**अभीर रवींद्र आगाशे**

२९, ५'९'', कौशिक, कोकणस्थ, गोरा, देव, वृश्चिक, अनुराधा, मध्य, तिसरा, O+ve, शिक्षण : M. Tech., नोकरी : Auto NOCTVT Electronics, मा. प्रा. : १.२५ लाख, अपेक्षा : पुणे, नोकरी, सुसंस्कृत, पत्ता : श्री. रवींद्र वैजनाथ आगाशे, कासा इम्पीरिया, वाकड, पुणे-५७. मो. : ९८२२७९०३०३

**प्रतिक मिलींद पुराणिक**

२९, ५'८'', कौशिक, देशस्थ यजुर्वेदी, देव, मकर, श्रवण, अंत्य, द्वितीय, AB+ve, शिक्षण : B.Com., MBA (Marketing), नोकरी : मा. प्रा. : २५,०००/-, अपेक्षा : अनुरूप, सुस्वभावी, मनमिळाऊ, पत्ता : श्री. मिलींद श्रीधर पुराणिक, गजानन पार्क, सी विंग, फ्लॅट नं. २०२/३, सराफनगर, नाशिक - ४२२००९. मो. : ९२२५१२११३६

**अनुप चंद्रशेखर देशपांडे**

२९, ५',९'', गौतम, ऋग्वेदी, देव, गोरा, मनुष्य, कुंभ, पुर्वाभाद्रपदा, आद्य, तृतीय, O+ve, शिक्षण : MCA (Computer Science), नोकरी : बँकेत, नाशिक येथे कायम, मा. प्रा. : ३०,०००/-, अपेक्षा : अनुरूप, नोकरी, गृहकर्तव्यदक्ष, पत्ता : श्री. चंद्रशेखर मोरेश्वर देशपांडे, ११, श्री बालाजी अॅव्हेन्यू, जगताप नगर, उंटवाडी, आशापुरी मॉलजवळ, उंटवाडी, नाशिक. मो. : ७५८८०९६३२८

**यश प्रमोद नांदुर्डीकर**

३०, ५'८'', भारद्वाज, यजुर्वेदी, गोरा, देव, कन्या, हस्त, आद्य, पहिले, AB+ve, शिक्षण : B.Com., M.B.A., (Marketing), नोकरी : पुणे, वा. प्रा. : ७.५० लाख, अपेक्षा : अनुरूप, नोकरी करणारी, पत्ता : श्रीमती आश्विनी प्रमोद नांदुर्डीकर, ६७१, जिजामाता शाळा, सातपूर कॉलनी, नाशिक-४२२००७, मो. : ९८२३८०४२३२, ८६००९६०१०७

**चिन्मय संजय बुलाख**

३०, ५'८'', गार्ग्य, देशस्थ यजुर्वेदी, गोरा, मंगळ आहे, चष्मा आहे, देव, तुळ, स्वाती, अंत्य, चतुर्थ, A+ve, शिक्षण : B.E. (E&TC), नोकरी : Linkedloop Technology Pvt. Ltd., वा. प्रा. : ३ लाख, अपेक्षा : मनमिळाऊ, नोकरी करणारी, एकत्र कुटुंबात राहणारी, पत्ता : श्री. संजय बुलाख, फ्लॅट नं. ८, शीतल सोसायटी, हिंगणे खुर्द, सिंहगडरोड, पुणे-४११०५१. मो. : ९४२३२०६२७३

**स्वानंद यशवंत वसगडेकर**

३०, ५'७'', गौतम, ऋग्वेदी, गव्हाळ, मनुष्य, मिथुन, आर्द्रा, आद्य, प्रथम, O+ve, शिक्षण : M.A. (English), नोकरी : MNC, मा. प्रा. : १ लाख, अपेक्षा : सुशिक्षित, सुस्वभावी, नोकरी करणारी, अनुरूप, पत्ता : श्री. यशवंत रघुनाथ वसगडेकर, फ्लॅट नं. ३, तिसरा मजला, साईशोभा अपार्टमेंट, आशीर्वाद नर्सिंग होम, श्रद्धाविहार कॉलनी, इंदिरानगर, नाशिक-४२२००९. मो. : ८७८६३६३४४१, ८७८८३६४५१७

**गौरव भालचंद्र वैद्य**

३०, ५'७'', कृष्णात्री, यजुर्वेदी, गोरा, चष्मा आहे, राक्षस, मकर, धनिष्ठा, मध्य, दुसरे, B+ve, शिक्षण : B.E. (Elect.), MBA (Retail), MBA (Operations), नोकरी : Cello Retail Pvt. Ltd., Mubai, वा. प्रा. : १२.३० लाख, अपेक्षा : सुसंस्कृत, सुशिक्षित, नोकरी करणारी व कुटुंबवत्सल, पत्ता : श्री. भालचंद्र वैद्य, 'शुभश्री' रेसिडेन्सी, गंगानगर, आकुर्डी, पुणे-४११०३५. मो. : ९९६७२४०४३३, ९८२०१५१२६५

**अक्षय गिरीश कुळकर्णी**

३०, ५'९'', मांडव्य, यजुर्वेदी, मनुष्य, वृषभ, रोहिणी, अंत्य, प्रथम, A+ve, शिक्षण : Civil Diploma, व्यवसाय, मा. प्रा. ६-७ लाख, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : श्री. गिरीश जगन्नाथ कुळकर्णी, गजानन सिटी, भुसावळ रोड, यावल, जळगाव. मो. : ७७०९४१९६९४, ९४०४५५९७९३



सुधीर करंजीकर, नाशिक

# संत श्री गजानन महाराज कृपांकित

## ह. भ. प. गोविंदबुवा टाकळीकर

श्री गजानन महाराजांच्या प्रकटीकरणात ज्यांचा महत्त्वाचा सहभाग होता, त्यातील एक ह. भ. प. गोविंदबुवा टाकळीकर होते.

शेगाव पासून २५ किमी अंतरावरील संगमपूर तालुक्यातील बावनवीर या गावी असलेल्या विश्वनाथ व भागीरथीबाई यांच्या पोटी गोविंदबुवांचा जन्म झाला. पणजोबा हरिनारायण हे बार्शी टाकळी येथे स्थायिक झाले. नंतर त्यांनी टाकळीकर हे आडनाव घेतले.

हे नाथसंप्रदायी घराणे होते. ज्येष्ठ बंधू भीष्मदेव यांनी बुवांना अनुग्रह दिला. बुवांचे आचरण अत्यंत शुद्ध होते. ते कृष्णभक्त होते. विख्यात कीर्तनकार, कथेकरी होते.

शास्त्राभ्यास, गीता, भागवत कथा यांचा बुवांवर पगडा होता. बुवांनी त्यांचा सखोल अभ्यास केला होता. त्यांना प्रासादिक वाणी लाभली होती. वयाच्या बाराव्या वर्षी बुवांचा सीताबाईंशी विवाह झाला. कोणतीही सुविधा नसताना गोविंदबुवा घोड्यावर बसून दूरदूरच्या ठिकाणी कीर्तनास जायचे. आपल्या रसाळ वाणीने समाजप्रबोधन करायचे. मिळालेल्या शिदोरीतून संसार चालवायचे. हे साधेसोपे काम नव्हते. शेगाव येथेही ते वारंवार कथा कीर्तनला यायचे.

उष्ट्या पत्रावळीवरील शिते वेचित असताना बंकटलाल अग्रवाल व त्यांचे स्नेही दामोदरपंत कुलकर्णी यांनी गजानन महाराजांना पाहिले. या प्रसंगानंतर महाराज तेथून निघून गेले. बंकटलालजींनी गावात सर्वत्र महाराजांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. चौथे दिवशी बंकटलाल व पीतांबर महाराज येथील प्राचीन शिवमंदिर (सध्याचे मोहे मंदिर) येथे गोविंदबुवांचे कीर्तन ठेवण्यात आले.

गोविंदबुवांनी आरंभीचे निरुपण सुरू केले. त्यांनी भागवताच्या अकराव्या स्कंधातील (हंसगीतामधील) एक श्लोक घेतला होता. बुवांनी त्याचा पूर्वार्ध विषद केला. समोर फरसावर बसलेल्या समर्थांनी त्याचा उत्तरार्ध म्हणून दाखविला. हे ऐकताच गोविंदबुवा महाराजांचे चरणी धावत आले. त्यांना साक्षात शिव म्हणून मंदिरात येण्याचा आग्रह करू लागले.

महाराजांनी त्यावेळी गोविंदबुवांना आशीर्वादरूपी शिकवण दिली. गोविंदा, ही रित बरी नव्हे. अरे सांगावे तसेच वागावे. आत्ताच तू ईश्वर सर्वत्र आहे, असे सांगत होतास ना! मग हा आग्रह का? जनात पोटभऱ्या कथेकरी होऊन तू राहू नकोस.

या उपदेशातून महाराजांनी बुवांवर कृपा केली होती. गोविंदबुवांनी तत्क्षणी महाराजांमधील चैतन्य ओळखून उपस्थित श्रोत्यांना जे भक्तीभावाने कळकळीने सांगितले ते अत्यंत महत्त्वाचे होते. त्यांनी महाराजांची थोरवी गायली.

हे अमूल्य रत्न शेगावी आले आहे, ते जतन करा. हे शेगाव नसून खचित पंढरपूर झाले आहे. हे साक्षात पांडुरंग आले आहेत. यांची आज्ञा वेदऋचेप्रमाणे माना. यातच तुमचे कल्याण आहे.

द्वितीय अध्यायात गोविंदबुवांचा द्वाड घोडा महाराजांच्या कृपेने शांत झाल्याचे वाचण्यात येते. महाराजांचा आशीर्वाद घेऊन बुवा पुढे निघाले.

विद्रुपा नदीचे काठी 'बार्शी टाकळी' हे ऐतिहासिक वारसा लाभलेले गाव आहे. अकोला मंगळूरपीर रस्त्यावर साधारणपणे २० किमी अंतरावर हे गाव आहे. येथे अत्यंत प्राचीन चंद्रमौळी खालेश्वराचे मंदिर आहे. हे शिवमंदिर हेमाडपंथी धाटणीचे असून यादवकालीन आहे. १९ एप्रिल १८८७, मंगळवारी माध्यान्ही गोविंदबुवांनी देह ठेवला. याच मंदिर परिसरात बुवांची समाधी आहे.

लाडकारंजा येथून श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे दर्शन घेऊन परततांना बार्शीटाकळी येथे दर्शनासाठी थांबले. खोलेश्वर महादेवाचे दर्शन घेऊन जवळील गोविंदबुवांच्या समाधीचे दर्शन घेतले. महाराजांच्या दिव्यत्वाची ओळख करून देणाऱ्या ह.भ.प. गोविंदबुवांचे समाधी दर्शन घेतांना जोडलेले हात व नयनी अश्रू ही अवस्था होती.

गुरुपौर्णिमे निमित्ताने संत श्री गजानन महाराज व तयंचे कृपांकित भक्त ह.भ.प. गोविंदबुवा टाकळीकर यांचे चरणी भक्तीमय वंदन!

(संदर्भ : पूजनीय दासभार्गव महाराज रचित श्री गजानन महाराज चरित्रकोश)

## अत्यंत महत्त्वाचे

देशस्थ ऋग्वेदी पत्रिकेत नोंदणी केलेल्या उपवर मुलामुलींचे लग्न ठरले / झाले त्यांनी कृपया त्वरित संस्थेत कळवावे. विवाह ठरविण्यासाठी संस्थेच्या वतीने कुठलेही प्रतिनिधी नेमण्यात आलेले नसल्याने उपवर मुला-मुलींच्या पालकांनी नोंद घ्यावी. विवाहा संबंधी कोणी विचारणा केल्यास संस्थेशी संपर्क साधवा व कुठलाही आर्थिक व्यवहार करू नये. त्यास संस्था जबाबदार राहणार नाही.

## ऋक श्रावणी

सालाबादाप्रमाणे संस्थेच्या ऋक श्रावणीचा कार्यक्रम रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७ वाजता संस्थेच्या श्री दुर्गा मंगल कार्यालयात आयोजित करण्यात येणार आहे. तरी सर्व इच्छुकांनी संस्थेशी ०२५३-२५९६४३६ ९३७३०९६६८९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## आधार / शैक्षणिक सामुदायिक व्रतबंध निधी

- श्री. विजय लक्ष्मण कुलकर्णी यांचेकडून आधार निधी रु. ११०० /-
- श्री. अशोक पंडितराव कुलकर्णी यांचेकडून आई कै. सौ. शांताबाई पंडितराव कुलकर्णी यांचे स्मरणार्थ आधारनिधी रु. १००१ /-
- श्री. अशोक पंडितराव कुलकर्णी यांचेकडून आजी कै.गं.भा. लक्ष्मीबाई नारायण कुलकर्णी यांचे स्मरणार्थ आधारनिधी रु. १००१/-
- श्री. अशोक पंडितराव कुलकर्णी यांचेकडून आजोबा कै. नारायण त्र्यंबक कुलकर्णी यांचे स्मरणार्थ आधारनिधी रु. १००१ /-
- श्री. किशोर लक्ष्मण पेटकर यांचे कडून आधार निधी रु. १००१/-
- श्री. अवधूत नारायण देशपांडे यांचेकडून आधारनिधी रु. ११००/-
- माधुरी कुलकर्णी यांचेकडून आधारनिधी रु. ५००/-
- श्री. प्रदीप मुरलीधर कुलकर्णी यांचेकडून सामुदायिक व्रतबंध निधी रु. ३५०० /-
- श्री. निषाद चिंतामण दशपुत्रे यांचेकडून सामुदायिक व्रतबंध निधी रु. ६००/-
- श्री. दीपक गंगाधर जहागीरदार यांचेकडून सामुदायिक व्रतबंध निधी रु. ५०५ /-
- श्रीमती सुचिता देवरे यांचेकडून सामुदायिक व्रतबंध निधी रु. ५००/-
- श्री. सचिन धनंजय कुलकर्णी यांचेकडून शैक्षणिक निधी रु. ३५००/-

## विवाह ठरले/झाले

१) कु. शिवानी राजेश शर्मा
२) चि. संकेत मिलिंद देशपांडे
३) प्रेषिता महेश पाठक, अहिल्यानगर


## देशस्थ ऋग्वेदी सभासद, हितचिंतक व देणगीदारांना विनम्र आवाहन

ज्या सभासद, हितचिंतकांना संस्थेच्या विविध उपक्रमांसाठी देणगी द्यावयाची आहे त्यांनी सोबत दिलेला क्यूआर कोड स्कॅन करून आपली देणगी संस्थेच्या खात्यात जमा करू शकतात. देणगीचे स्वरूप, देणगीदाराचे नाव व ट्रान्सफर केल्याचा स्क्रिनशॉट संस्थेच्या व्हॉट्सॲप नंबरवर पाठवणे अनिवार्य आहे. तसेच ज्या सभासदांना 'देशस्थ ऋग्वेदी पत्रिका' अंक दरमहा पोहोचत नसेल त्यांनी आपला पत्ता बदलला असल्यास नवीन पत्त्याची नोंद संस्था कार्यालयात करावी.

**देशस्थ ऋग्वेदी संलग्न संस्थांनी आपआपल्या भागातील वृत्त ऋग्वेद पत्रिकेत प्रसिद्धीसाठी द्यावयाचे असल्यास दरमहिन्याच्या २८ तारखेपर्यंत संस्था कार्यालयात पाठवावे.**

**वृक्ष लावा दारोदारी, समृद्धी नांदेल घरोघरी!**

तिकीट न लावता अंक पाठविण्यासाठीचा रजि. परवाना क्रमांक NSK 236 / 2021-2023
दर महिन्याच्या ५ तारखेस अंक पोस्टात (GPO, Nashik) टाकला जातो.

पदमाकर देशपांडे

# श्रीदत्त महात्म्य

## चतुर्थोध्याय

श्री गुरुदत्तात्रेय नम:!

कृतयुगामध्ये सोमवंशात शत्रूंना जिंकण्यासाठी विख्यात असलेल्या 'हैहय' कुळात धर्माचे पालन करणाऱ्या सार्वभौम अशा कृतवीर्य राजाचा जन्म झाला. त्याला शंभर पुत्र झाले मात्र ते च्यवन मुनिंच्या शापामुळे मरण पावले. राजाला त्याचे दु:ख झाल्यामुळे त्याने शोकाने राज्य सोडले. तर एके दिवशी अकस्मात त्याला गुरु येऊन भेटले. राजाने खिन्न चित्ताने त्यांना दंडवत घातले.

राजा म्हणाला, "हाय हाय.. मला पुत्र नाही मी काय करू? दैवी कृपेने आपले पाय मला नमस्कारासाठी मिळाले, त्यामुळे माझे दु:ख दूर होईल."

गुरु म्हणाले, "राजा धैर्य धर. मी तुला उपाय सांगतो. त्यामुळे तुझा वंश वाढेल. सूर्याचे 'रवी व्रत' आहे ते सर्व पाप शांत करेल आणि अत्यंत उत्तम सुख देणारा पुत्र मिळेल. जन्मत:च वांझ नारी असेल किंवा पुत्र मरण पावलेली वांझ असेल तिने हे व्रत केले, तर तिला निश्चितपणे चांगला पुत्र होईल. ज्या स्त्रीच्या गर्भाचे नऊ महिने होण्यापूर्वी पतन होते किंवा मृत बालक जन्मते किंवा जन्मत:च मूल मरते किंवा बाळपणी मरते, ग्रह भूत रोग किंवा आकस्मित मृत्यू अशा प्रकारचे सगळे दोष या व्रतामुळे दूर होतात. सप्तमी असलेल्या रविवारच्या दिवशी पंचांगशुद्धी पाहून चंद्र अनुकूल असल्याचे जाणून व्रताला आरंभ करावा. व्रताचा संकल्प करून पुण्याहवाचन, नांदीश्राद्ध करून आचार्यांना नमस्कार करावा. आचार्यांकरवी गृहशुद्धी करून अग्नी स्थापन करावा. विधीपूर्वक कलश मांडून त्यावर देवता स्थापाव्या. सूर्य, रुद्र, सप्त मातृका यांच्या सुवर्ण प्रतिमा पाहून पूजन करून उत्तरेच्या दिशेला शांती करण्यासाठी सात कलश ठेवावे. त्यांची पूजा करून शांतिसुक्त म्हणून विधीपूर्वक हवन करावे. त्यामध्ये काळे तीळ, जव, पायस अशा प्रत्येकी एकशे आठ आहुती द्याव्या. होमानंतर बलिदानविधी करावा. पूर्णाहुती करून सुवासिनीकरवी कलशातील पाण्याने अभिषेक करावा. यांचा बाळ दीर्घायु होवो. सूर्य आदि ग्रहमंडळ, त्रिमूर्ती, सर्व लोकपाल यांनी नेहमी बाळाचे रक्षण करावे. प्रत्येक दिनी सर्वांनी बाळाचे रक्षण करावे, बाळाला ग्रह, भूत, अग्नी, शनी यांनी रात्री किंवा दिवसा पीडा देऊ नये असं चिंतन करून अभिषेक करावा. स्नान करून ती वस्त्र आचार्यांच्या हाती द्यावी. मग आचार्याला गाय अर्पण करावी, तिळाच्या पात्रात काळाची मूर्ती पुजून ती ब्राह्मणास देऊन ब्राह्मण भोजन करावे. दक्षिणा देऊन त्यांचा आशीर्वाद घ्यावा; म्हणजे संकटाचे निरसन होईल. बालक दीर्घायु होवो, शंभर वर्ष सुख भोगो. याचे जे दु:ख, अरिष्ट आहे ते अग्नीच्या मुखात पडो! ब्रह्मदेव, हरिहर, षडानन, इंद्र, वायू, हुताशन यांनी अरिष्टाचे निरसन करावे असे आशीर्वचन ब्राह्मणांनी द्यावे. यावेळी सर्व कर्म ईश्वराला अर्पण करावे. कुटुंबसह भोजन करावे. मग सूर्याच्या प्रसादामुळे अरिष्ट निरसन होऊन संतान वाढेल."

